# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.08.2026** **वारःशनिवार**

---

1. ऐंशीव्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधानांच्या हस्ते नवी दिल्लीत लाल किल्ल्यावर ध्वजारोहण, या सोहळ्यात प्रथमच वंदे मातरम् गीताचं सादरीकरण
2. विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी 'सप्तधारा शक्ती' या संकल्पनेची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा
3. नवभारताच्या उभारणीसाठी स्वतःपेक्षा देशहिताला महत्त्व देण्याचा संकल्प सगळे मिळून करु-पंतप्रधानांचं आवाहन
4. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींचं देशाला संबोधन; युद्ध आणि अस्थिरतेच्या काळात वेगाने आर्थिक वाढ झाल्याचं प्रतिपादन आणि
5. भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना आजपासून रंगणार

<u>पंतप्रधान</u>

आगामी काही वर्षात विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी 'सप्तधारेची शक्ती' या संकल्पनेची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केली. उत्पादन क्षमता, कृषीमाल आणि अन्नप्रक्रिया, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, गतीशक्ती, संरक्षण आत्मनिर्भरता, हरित आणि नील अर्थव्यवस्था तसंच योग, कला, वन्यसंपदा यासारखी देशाची सूप्त शक्ती या सात शक्तींच्या सहाय्याण आपण देशाला नव्या उंचीवर नेऊ शकतो असं पंतप्रधान म्हणाले. ऐंशीव्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी दिल्लीत लाल किल्ल्यावर पंतप्रधानांच्या हस्ते ध्वजारोहण झालं; त्यानंतर त्यांनी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून भाषण केलं. विकसित भारताचं स्वप्न साकार करताना युवा शक्तीचं सामर्थ्य महत्त्वाचं ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 2047 मध्ये स्वातंत्र्याची शंभर वर्ष पूर्ण करताना विकसित भारत होण्याचा देशाचा निर्धार आहे. मोठी स्वप्नं, संकल्प देशाला प्रगतीच्या दिशेने नेतात, देशाचं सामर्थ्य वाढवतात आणि त्यातूनच स्वप्नं साकार होतात, असं प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं.

आज प्रत्येकाच्या मनात वंदे मातरम् ची, देशप्रेमाची भावना आहे. आज देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग आणि बलिदान करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचं स्मरण करण्याचा दिवस आहे याची पंतप्रधानांनी आठवण करुन दिली.

गेल्या 12 वर्षांत देशात विकासाची गती वाढते आहे. सर्वच क्षेत्रात कित्येक पटींनी प्रगती झाली आहे. विकसित भारताचं स्वप्न आता दूर नाही. हे स्वप्न साकार करण्यासाठी आत्मविश्वासाबरोबरच आत्मनिर्भरतेची गरज आहे. याच दृष्टीनं देशात अनेक धोरण तयार करण्यात आली आहेत. सेमीकंडक्टर उत्पादन, दुर्मिळ खनिज, उर्जा सुरक्षितता या क्षेत्रात आत्मनिर्भरतेसाठी अत्यंत वेगानं कांम सुरू आहे. इंधन तेलाच्या आयातीवरचं अवलंबित्व कमी करण्याचा भारताचा प्रयत्न आहे असं पंतप्रधान म्हणाले. देशातल्या परिस्थितीबाबत सतत नकारात्मक वातावरण तयार करुन नागरिकांना घाबरवण्याचं काम काहीजण करत होते. मात्र आम्ही नागरिकांना सर्वोच्च प्राधान्य देत जगातल्या संकटांचा सामना यशस्वीपणे करत आहोत.

आज भारताकडे जगातले देश सुरक्षित, शक्तीशाली, वेगानं प्रगती करणारा देश म्हणून पहात आहेत. त्यामुळेच भारतातली गुंतवणूकही वाढत आहे, अशावेळी आपल्याला जागतिक स्पर्धेला यशस्वीपणे सामोरं जावं लागेल. या शतकातली आगामी 25 वर्ष आपल्यासाठी महत्त्वाची आहेत. या काळात आपल्याला आपली विचारसरणी, कामाची पद्धत बदलावी लागेल, सुधारणा घडवाव्या लागतील असं पंतप्रधानांनी सांगितलं.

देशाच्या उज्ज्वल सामर्थ्यशाली युवा पिढीसाठी नशामुक्त भारत मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावं असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. आगामी वर्षभरात एक कोटी युवकांना कृत्रिम बुद्धीमत्तेचं प्रशिक्षण देण्याची घोषणा त्यांनी केली. मध्यमवर्गीय घरांमधील विद्यार्थ्यांसाठी विविध परीक्षांचं मोफत ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी काम सुरू असून देशातल्या क्रीडा प्रतिभेचा शोध घेण्यासाठी अभियान राबवलं जाईल, असं मोदी यांनी सांगितलं. स्वतःपेक्षा देशहिताला महत्त्व देण्याचा संकल्प आपण सगळे मिळून करुया, एकमेकांच्या साथीनं नवा भारत घडवूया असं आवाहन त्यांनी देशवासियांना केलं. जनगणनेच्या काममध्ये युवा पिढीने योगदान देण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं....

**मैं देश के नौजवानों को कहता हूँ की आप अपने परिवार के लोगों को बिठा कर के पूरे फॉर्म को समझिए पहले कागज पे फॉर्म को भर दीजिए कोई गलती है तो करेक्ट कर लीजिए और फिर टेक्नोलॉजिकली उसको डिजिटल। इसको अपलोड कर दीजिए आप देखिए इतना बड़ा काम देश कर लेगा और देश का समय और शक्ति सही काम के लिए उपयोग आएगा और इसलिए मेरे देश के नौजवानों को जनगणना के इस काम में सक्रियता से जुड़ने के लिए मैं आग्रह करता हूँ।**

या वर्षी प्रथमच स्वातंत्रदिन सोहळ्यात लाल किल्ल्यावरून वंदे मातरम् गीताचं सादरीकरण झालं. देशभक्तीने भारावलेल्या वातावरणात झालेल्या या सोहळ्यासाठी विविध क्षेत्रातील पाच हजार मान्यवर उपस्थित आहेत.

**स्वातंत्र्यदिन-राज्य**

मुंबईत मंत्रालयात झालेल्या मुख्य शासकीय कार्यक्रमात सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.  तर राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते पुण्यात विधान भवनात ध्वजारोहण झालं. ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते

**राष्ट्रपती-संदेश**

स्वातंत्रदिनाच्या पूर्वसंध्येला काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाला संबोधित केलं. जगाच्या अनेक भागांत युद्ध आणि अस्थिरता असतानाही भारताची अर्थव्यवस्था वेगानं वाढणारी मोठी अर्थव्यवस्था म्हणून आगेकूच करत आहे असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी केलं.

शाश्वत विकासाची 2030 साठीची काही उद्दीष्टं भारतानं वेळेआधीच पूर्ण केल्याचं त्यांनी नमूद केलं. राष्ट्रहित हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया असून शांतता, सहकार्य, संवाद आणि वसुधैव कुटुंबकम हा विचार हे त्याचे चार मजबूत खांब आहेत असं त्यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूरनं भारताच्या लष्कराचं दहशतवादाविरोधात अचूकतेनं कारवाई करण्याचं सामर्थ्य दाखवून दिलं. देश नक्षलमुक्त झाला आहे.

एकेकाळी नक्षलग्रस्त असलेला प्रदेश आता उत्साहानं भारलेला असणं, हे मोठं यश असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. विद्यार्थी म्हणजे भारताच्या भविष्याचे रचनाकार असून प्रत्येकानं त्यांचं भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सार्वजनिक सेवेतील परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी सरकार ठोस उपाययोजना करत आहे असं त्यांनी सांगितलं.

**शुभेच्छा**

देशाच्या स्वातंत्रदिनानिमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी जनतेला  शुभेच्छा दिल्या आहेत.

**शौर्य पुरस्कार**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला, संरक्षण दल आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांतील जवानांसाठी 78 शौर्य पुरस्काराला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली. यापैकी 13 पुरस्कार मरणोत्तर प्रदान केले जाणार आहेत. यामध्ये 9 कीर्ती चक्र, एक-बार टू शौर्य चक्र, 19 शौर्य चक्र, पाच- बार टू सेना शौर्य पदक, 36 सेना पदक, 3 नौसेना पदक, पाच वायुसेना पदकांचा समावेश

आहे. लेफ्टनंट कर्नल मॅनिओ फ्रान्सिस पीएफ आणि मेजर जितेंद्र राठी यांना 'कीर्ती चक्रा'; तर हवालदार गजेंद्र सिंग, हेड कॉन्स्टेबल जगबीर सिंग, बशीर अहमद, एसजी कॉन्स्टेबल जसवंत सिंग, बलविंदर सिंग, तारिक हुसेन आणि एसटीएफ इन्स्पेक्टर सुनील कुमार यांना मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान केले जाईल.

**परराष्ट्र-जायस्वाल**

जम्मू आणि काश्मीर, लडाख हे भारताचे अविभाज्य आणि अभिन्न अंग असल्याचं भारतानं पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे. दिल्लीत काल परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल वार्ताहर परिषदेत बोलत होते. पाकव्याप्त काश्मिरमध्ये सुरु असलेले अत्याचार आणि सीमापार दहशतवादासाठी केला जाणारा या परिसराचा वापर याकडे आंतरराष्ट्रीय समुदायानं लक्ष देण्याची गरज त्यांनी यावेळी नमूद केली.

**लोकायुक्त-संस्था**

मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती सुरेंद्र तावडे याणि महाराष्ट्राच्या माजी पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह चार सदस्यांनी काल महाराष्ट्र लोकायुक्त संस्थेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. निवृत्त मुख्य जिल्हा न्यायाधीश सुवर्णा केओले, निवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव ओम प्रकाश गुप्ता यांनीही काल शपथ घेतली.

**निर्मला-सीतारामन**

पंतप्रधान इंटर्नशिप योजना ही उद्योगांच्या अपेक्षा आणि या योजनेअंतर्गत नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या कौशल्यांमधील अंतर भरून काढण्यासाठी तयार करण्यात आली आहे, असं प्रतिपादन वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं. त्या नवी दिल्लीत प्रशिक्षणार्थींशी संवाद साधत होत्या. उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, पदवीधर आणि आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या युवकांशी चर्चा केल्यानंतर ही योजना तयार करण्यात आली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना आज श्रीलंकेतील गॉल इंटरनेशनल क्रिकेट स्टेडियमवर सुरू होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी 10 वाजता सामना सुरू होईल. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघात अनुभवी खेळाडूबरोबरच काही नव्या चेहऱ्यांचाही समावेश आहे.

**इंडोनेशिया-भूकंप**

इंडोनेशियात आज सकाळी 7 पूर्णांक 7 रिख्टर क्षमतेचा भूकंप झाला. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही मात्र अनेक घरांचं आणि सार्वजनिक इमारतींचं नुकसान झालं असून तिथल्या हवामान विभागानं नुसा टेंगारा आणि सुलवेसा भागात त्सुनामीचा इशारा दिला आहे.

**ओडिशा-पूर**

ओडिशामधील पूरस्थिती गंभीर झाली असून, संततधार पावसामुळे पाणी पातळीत वाढ होत असल्यानं उत्तर ओडिशातील जिल्ह्यांवर पुराचा परिणाम झाला आहे. आजही काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.